पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑक्टोबर २०१९

## Appreciation Letter...

Dear Dr. Venkatesam,

Good Morning

Day before yesterday, I had to take my Mother in Law, aged 97+ and barely able to walk, to a doctor on Siddharth road off Max Mueller Bhavan road.

There was no parking on the side near the doctor. So I asked the traffic cop to allow me to park, which he willingly did. After taking her into the clinic I parked my car in the correct location.

After the doctors appointment was over, I brought my car to the earlier location. A traffic police constable's came there and graciously and politely helped to get her settled in. The police constable's name was 'Nana' and he joined the police after a stint in the army. He was later talking to his superior on the walky-talky and I talked to her to commend Nana for being what a policeman should be.

It is good to meet a policeman who cares. May there be many more "Nanas".

Thank you
Sincerely

# समुपदेशन व
# सामाजिक बांधिलकी

समुपदेशन व
सा. बांधिलकी

**लोकमत** – दि. ६ ऑक्टोबर, २०१९



## सानिका खादीग्रामचा वर्धापन दिन

पुणे : लो. टिळकांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या विंचुरकरवाड्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती व सानिका खादीग्रामचा वर्धापन सोहळा संपन्न झाला. त्यानिमित्त २ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरपर्यंत सर्व खादी कपड्यांवर २०% सवलत देण्यात येणार आहे, सर्वांनी याचा लाभ घ्यावा. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याचे भा.पो.से. अपर पोलीस आयुक्त मा. सुनील फुलारी, तर प्रमुख मार्गदर्शक वक्ते म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना श्रीपाल सबनीस म्हणाले की, खादी केवळ वस्त्र नाही तर सर्वधर्म समभावतेचे प्रतीक आहे. खादी श्रमाची भाषा आहे. स्वावलंबनाचा अंगीकार आहे. ग्रामविकासाच मूळ आहे आणि जीवनाचा संस्कार म्हणजे खादी आहे. हा संस्कार जोपासत प्रत्येकाने आपल्या जीवनात खादीचा अंगीकार केला पाहिजे, हीच महात्मा गांधींना आदरांजली ठरेल. जगभर हिंसेचा उद्रेक होत असताना यापुढच्या कठीण काळात गांधींचे विचारच जगाला तारू शकतील. आज ११० हून अधिक देशात म. गांधी जयंती 'अहिंसा दिन' म्हणून साजरी केली जाते, हे त्याचेच द्योतक आहे. कार्यक्रमाला एसआरपीएफचे समादेशक तानाजी चिखले, मत्स्य विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अभय देशपांडे, उद्योगपती जी. ए. भिलारे, शासकीय फोटो झिंकोचे माजी व्यवस्थापक नरेश गोटे, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत जयंत (बापू) मठकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक सानिका खादीग्रामचे संचालक सुनील जाधव यांनी केले. (वा.प्र.)

**लोकमत** – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९



## दिवाळीतही कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांचा सत्कार

हडपसर : मराठा टायगर फोर्स महाराष्ट्र राज्याच्या वतीने 'ड्युटी पलीकडचा माणूस' या संकल्पनेतून हडपसर पोलीस स्टेशन आणि हडपसर पोलीस वाहतूक विभाग येथे सर्व उपस्थित पोलीस बांधवांचा तसेच अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

वर्षभर जनतेच्या सुरक्षिततासाठी तसेच जनतेची सेवा करण्याच्या हेतूने कुठल्याही सण उत्सवात सुट्टी न घेता पोलीस मात्र रस्त्यावर असतात. ड्युटीवर असतात तसेच दिवाळीच्या निमित्ताने सर्वत्र महाराष्ट्रभरात सुट्टी असताना देखील पोलीस बांधव ड्युटीवर हजर असतात. त्यामुळे आपले माणुसकीच्या नात्याने कर्तव्य समजून त्यांच्यासोबत एक दिवस जाऊन त्यांचा सन्मान करण्याची जबाबदारी आपली म्हणजे जनतेची असते आणि ते सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आज 'मराठा टायगर फोर्स' या सामाजिक संघटनेने आज हडपसर पोलीस स्टेशन व हडपसर वाहतूक विभागमधील पोलीस बांधवांचा सत्कार केला.

त्यावेळी मराठा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष संदीप लहाने यांनी सर्व पोलीस बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच प्रदेश उपाध्यक्ष नीलेश काळे तसेच जयप्रकाश जाधव, दिलीप तुपे, रघुवीर तुपे, संतोष मुळे, अशोक खाडे, अशोक नलावडे, शुभम भोसले, आदित्य गायकवाड, अक्षय भोसले तसेच सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.



सहकारनगर पोलीस ठाण्यातील महिला पोलिसांचा सन्मान करताना सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते.

# जागर स्त्री शक्तीचा, सन्मान आदिशक्तीचा

लोकमत न्यूज नेटवर्क

धनकवडी : दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, दसरा असे सण आणि उत्सव मंगलमय वातावरणात पार पडावा, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी बंदोबस्तात कार्यरत असणाऱ्या महिला पोलिसांचा सन्मान खडकवासला विभाग पतित पावन संघटनेसह अनेक सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आला.

जागर स्त्री शक्तीचा सन्मान आदिशक्तीचा या उक्रमाअंतर्गत संघटनेचे अध्यक्ष विजय विठ्ठल क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सर्व क्षेत्रातील महिलांचे मनोधैर्य वाढावे, या उद्देशाने गेली अनेक वर्षे हा सन्मान केला जात आहे.

म्हणुनच नवरात्रीचे औचित्य साधून पोलीस दलात काम करणार्या महिला पोलीस यांचा सन्मान आदिशक्तिचा या उपक्रमा अंतर्गत पतित पावन संघटना, दक्षिण पुणे नागरी समन्वय समिती, सिद्धिविनायक ग्रुप, जनहित फाउंडेशन, महिला दक्षता समिती सहकारनगर व भारती विद्यापीठ पोलीस ठाणे यांच्या वतीने महिला पोलिसांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप जगताप, शहाजी आरसूळ, योगेश पोरेडी उपस्थित होते.

PuneMirror - 2 October, 2019

# Bharosa Cell tackles neglect of ex-MP's cousin

## Sr citizens' cell counselled children of 85-year-old Baban Tupe for abandoning their father in old age home for 6 mnths

Gunwanti.Paraste
@timesgroup.com

TWEET @gunwantimirror

The age-old saga of children abandoning their elderly parents had a possibly happy ending in the city, after the intervention of the Bharosa Cell's senior citizens' unit under Pune police.

An 85-year-old man — who happens to be the cousin of late Member of Parliament (MP) from Pune, Vitthal Tupe — had only last week contacted the cell's special helpline, lamenting that he has been abandoned in his twilight years by his three children and shunted off into an old age home, where none of them have even called him for the last six months. This, claimed Baban Tupe, was despite that fact that he had ensured their long-term financial stability by selling his home last year.



Tupe with cops; the latter informed his children that they could face action under the Senior Citizens Act; (R) the old age home where Tupe was housed without money, after his Hadapsar 5-BHK house was sold

Finally, the octogenarian gave a verbal complaint to the police days ago over a call, after which Bharosa Cell cops reached out to the Matoshri Old Age Home near Rajaram Bridge where he is housed, and listened patiently to his sorrowful tale. Soon, his adult children were called for a counseling session and given a dressing down, leaving only after signing a bond that they would not neglect their only surviving parent in times to come.

Tupe had told police, "I was first shifted to an old age home in Bhor in March this year, then to Matoshri. My two daughters and one son did not contact me since. For them, I had sold our Hadapsar home last year. My son had moved away from me and my wife (who passed away in 2009), to Pimpri-Chinchwad, after his second marriage. At the time, my wife and daughter-in-law did not get along, so we thought it best to separate. After my wife died a decade ago, I was living alone. My elder daughter said I could stay with her for the rest of my life if I sold the Hadapsar house, but she then admitted me into an old age home. I was alone all the time, and didn't even get any money. Finally, I called the police for justice. My children have agreed to give me company and care for me. I am thankful to the Bharosa Cell."

Tupe's son, who did not wish to be named, told *Mirror*, "I have stayed away from my parents for 18 years, thrown out by my father when my wife and mother fought. For years, my father was living alone in a 5-BHK with four tenants, getting Rs 12,000 per month from each of them as rent. But suddenly, my father said he wanted to sell the property, and gave the power of attorney to my sister. All of us got some amount of the money and he moved to my sister's house. For a year, I was not in touch with any of them. Then suddenly the police called and called us siblings out for neglect. I did not know he is living this way. My sisters and I have now promised to take care of medicines for our father and care better."

A cop from the senior citizens' cell told *Mirror*, "Tupe approached us on our 1090 helpline number. Since he could not come to us, we went to him and got a written statement, then called his children. After counseling, his children agreed to meet their father every month, in a signed statement to us."

Similarly, police inspector Vaishali Chandgude shared, "Constable Jayashri Jadhav had coordinated this case. We counseled the children and cautioned them that they could face action under the Senior Citizens Act for such behaviour. We made it clear that it is their responsibility to set aside time and take care of their own father."

# भरोसा, दामिनी पथक सदैव महिलांबरोबर : कारंडे



पुणे, दि. ३० - महिलांच्या समस्यांबाबत भरोसा आणि दामिनी पथक कार्यरत आहे. ज्या ठिकाणी महिलांना असुरक्षित वाटते, त्याठिकाणाहून महिलांनी आमच्याशी संपर्क साधल्यास आम्ही त्वरित त्यांच्या मदतीसाठी जातो. त्यामुळे महिलांनी स्वत:ला कधीही एकटे समजू नये, भरोसा आणि दामिनी पथक सदैव महिलांबरोबर आहे, असे भरोसा सेलच्या प्रमुख विजया कारंडे यांनी सांगितले. नवरात्रोत्सवानिमित्त त्या बोलत होत्या.

महालक्ष्मी मंदिराच्यावतीने भरोसा आणि दामिनी पथकातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी परिमंडळ एकच्या पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, भरोसा सेलच्या प्रमुख विजया कारंडे, अभिनेत्री स्मिता शेवाळे यासह मंदिराचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी आदी उपस्थित होते. सन्मान सोहळ्यानंतर प्रीया डिसा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शास्त्रीय नृत्य सादर केले.

# पोलीस कोणाचेही शत्रू नसतात!

## निखिल मुनोत : शहर पोलीस विभागाला बॅरिकेट्स वाटप

**कात्रज, दि. १७ -** पोलीस कोणाचेही शत्रू नसतात; परंतु आपण स्वतःलाच शिस्त लावल्याशिवाय लागत नाही. तसेच आपल्यासाठी गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी या सणांपासून स्वतःला वंचित ठेवून नागरिकांच्या हितासाठी ड्युटीवरच्या पोलिसांचा ड्युटीपलीकडचा माणूस या नात्याने विचार करून मान देणे गरजेचे असून माणुसकीचे नाते जोपासणे गरजेचे असल्याचे निखिल मुनोत यांनी सांगितले.



कात्रज-कोंढवा रोडवरील सामाजिक कार्यकर्ते निखिल अशोक मुनोत यांनी वर्षभर २४ तास ऊन, वारा, पाऊस याचा विचार न करता नागरिकांच्या संरक्षणासाठी आपल्या ड्युटीतून स्वतःचा जीवाची पर्वा न करता वाहतूक नियमन करणाऱ्या पुणे शहर वाहतूक पोलीसबांधवांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता.

यावेळी पुणे शहर वाहतूक विभागाला मुनोत यांच्याकडून पोलीस बॅरिकेट्स देण्यात आले. याप्रसंगी उपस्थित पुणे शहर वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस उपायुक्त नागनाथ वाकुडे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत लोहकरे, वर्षा ऍंथोनी तसेच सर्व पोलीसबांधवांनी उपक्रमाचे कौतुक करून पोलिसांबाबत असणाऱ्या आदराबाबत आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमास मुनोत शिक्षण संस्थेचे संस्थापक अशोक मुनोत, स्वारगेटचे पोलीस निरीक्षक अतुल नवगिरे, पोलीस निरीक्षक बाळासाहेब मुन्हे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय धुमाळ, सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल राका, सचिन पाटील, गणेश शिंदे, ज्ञानेश्वर वाघमारे तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# संघटनांतर्फे महिला पोलिसांचा सन्मान



**कात्रज, दि. ३० -** महाराष्ट्रामध्ये दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र, दसरा, दिवाळी असे अनेक सण आणि उत्सव मंगलमय वातावरणात पार पडावेत आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी. यासाठी बंदोबस्तात कार्यरत असणाऱ्या महिला पोलिसांचा सन्मान खडकवासला विभाग पतित पावन संघटनेसह अनेक सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आला.

जागर स्त्री शक्तीचा सन्मान आदिशक्तीचा या उक्रमाअंतर्गत संघटनेचे अध्यक्ष विजय विठ्ठल क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सर्व क्षेत्रातील महिलांचे मनोधैर्य वाढावे. या उद्देशाने गेली अनेक वर्षे हा सन्मान केला जात आहे. नवरात्रीचे औचित्य साधून पोलीस दलात काम करणाऱ्या महिला पोलीस यांचा सम्मान अदिशक्तीचा या उपक्रमांतर्गत पतित पावन संघटना, दक्षिण पुणे नागरी समन्वय समिती, सिद्धीविनायक ग्रुप, जनहित फाउंडेशन, महिला दक्षता समिती सहकारनगर व भारती विद्यापीठ पोलीस ठाणे यांच्या वतीने महिला पोलिसांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप जगताप, शहाजी आरसूळ, योगेश पोरेडी उपस्थित होते.

# भांडण करून पळालेला मुलगा सुखरूप परत

**पुणे : प्रतिनिधी**

आई-वडिलांशी वाद झाल्यानंतर रागातून घर सोडून पुण्यात आलेल्या मुलाला पोलिसांनी पुन्हा कुटुंबीयांकडे सुखरूप परत केले. त्याला डान्स शिकण्याची आवड होती, पण पालक कायद्याचे शिक्षण घेण्यास जबरदस्ती करत होते. यामुळे तो कर्नाटकातून पुण्यात आला होता.

वरुण नारायण गौडा (वय १८) असे या मुलाचे नाव आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंढवा पोलिस परिसरात पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी रेल्वे रुळाच्या बाजूने एक मुलगा संशयितरीत्या फिरत असल्याचे दिसून आले. पोलिस नाईक बोबडे व सोनवणे यांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला नाव विचारल्यानंतर त्याने वरुण गौडा असे नाव सांगितले. विचारपूस केली असता तो टाळाटाळ करू लागला. त्याला पोलिस चौकीत आणले. विश्वासात घेऊन माहिती घेतल्यानंतर त्याने आई-वडिलांशी झालेल्या वादातून आपण पळून आल्याचे सांगितले.

वरुण याला डान्सचे शिक्षण घ्यायचे होते; पण त्याने कायद्याचे (एलएलबी) शिक्षण घ्यावे यासाठी पालक जबरदस्ती करत होते. म्हणून आपण घरातून पळून आल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी त्याच्या वडिलांचा संपर्क क्रमांक मिळविला. त्यांना मुलगा सापडला असून, तो सुखरूप असल्याची माहिती दिली.

पुण्य नगरी – दि. १२ ऑक्टोबर, २०१९

# सावंत महाविद्यालयात रस्ते वाहतूक सुरक्षाविषयक जनजागृती



**। धायरी : प्रतिनिधी**

नऱ्हेतील टीएसएसएमच्या भिवराबाई सावंत अभियांत्रिकी महाविद्यालयात पुणे वाहतूक पोलीस आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रस्ते वाहतूक सुरक्षाविषयक कार्यक्रम घेऊन जागृती करण्यात आली. त्यानिमित्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना रस्ते वाहतूक सुरक्षाविषयक पोस्टर, व्हिडीओ आणि व्याख्यान आदींच्या माध्यमातून माहिती दिली.

यावेळी संस्थेचे विश्वस्त ऋषिराज सावंत, संकुल संचालक डॉ. वसंतराव बुगडे,प्राचार्य डॉ. गणेश हिंगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक, उपप्राचार्य डॉ. दयानंद बिळगी, प्रा. डी. आर. पिसाळ, संकुल समन्वयक विकास जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. देविदास बराले, प्रा. श्रीधर राखोंडे आदी उपस्थित होते.

पुराणिक म्हणाले, पुण्याच्या वाहतुकीला शिस्त लावण्याचे काम महाविद्यालयाचे तरुणच पोलिसांच्या मदतीने करू शकतात. त्यासाठी तरुण- तरुणींनी पुढे येण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

संयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. देविदास बराले, प्रा. श्रीधर राखोंडे आदींनी केले. सूत्रसंचालन यशश्री घोहाड, सूरज पाताळे, श्वेता मोकाडे यांनी केले. प्रा.डी. आर. पिसाळ यांनी आभार मानले.

पुण्य नगरी – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

# ‘ड्युटीपलीकडचा माणूस’ संकल्पनेतून मराठा टायगर फोर्सची पोलिसांसोबत दिवाळी



**। पुणे :** मराठा टायगर फोर्स महाराष्ट्र राज्यतर्फे ‘ड्युटी पलीकडचा माणूस’ या संकल्पनेतून हडपसर पोलीस स्टेशन आणि हडपसर पोलीस वाहतूक विभागातील सर्व पोलीस बांधवांचा तसेच अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. वर्षभर जनतेच्या सुरक्षिततेसाठी तसेच जनतेची सेवा करण्याच्या हेतूने कुठल्याही सण उत्सवात सुट्टी न घेता पोलीस मात्र रस्त्यावर असतात, ड्युटीवर असतात, तसेच दिवाळीनिमित्त सर्वत्र सुट्टी असताना देखील पोलीस बांधव कामावर हजर असतात. त्यामुळे माणुसकीच्या नात्याने कर्तव्य समजून त्यांच्यासोबत एक दिवस जाऊन त्यांचा सन्मान करण्याची जबाबदारी आपली असते आणि ती सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी दिवाळीनिमित्त मराठा टायगर फोर्स या सामाजिक संघटनेने हडपसर पोलीस स्टेशन व हडपसर वाहतूक विभागातील पोलीस बांधवांचा सत्कार केला. त्यावेळी मराठा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष संदीप लहाने पाटील यांनी सर्व पोलीस बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच, प्रदेश उपाध्यक्ष निलेश काळे- पाटील तसेच जयप्रकाश जाधव, दिलीप तुपे, रघुवीर तुपे, संतोष मुळे, अशोक खांडे, अशोक नलावडे, शुभम भोसले, आदित्य गायकवाड, अक्षय भोसले, तसेच सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोबाईल वेडापायी मुलीने सोडले घर

पुणे, ता. १६ : 'ती' मध्यमवर्गीय कुटुंबातील; पण दहावीच्या परीक्षेत नापास झाल्यामुळे घरीच होती. एकटीला कंटाळा येतो म्हणून तिने मोबाईलशी संगत केली. त्यातून फेसबुकद्वारे तिला काही मित्र-मंडळी मिळाली. पण, सतत मोबाईल बाळगल्यामुळे आई-वडील तिच्यावर रागावले. त्यामुळे पालक स्वातंत्र्यच देत नाहीत म्हणून 'ती' मुंबईहून पुण्याला मित्रांना भेटण्यासाठी आली. भेदरलेल्या अवस्थेत रस्त्याकडेला बसलेली 'ती' चाणाक्ष पोलिसांच्या निदर्शनास आली आणि पोलिसातील माणुसकीने तिला आई-वडिलांच्या सुखरूप स्वाधीन केले!



१६ वर्षांची प्रियांका (नाव बदलले आहे) मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी. मुंबईतील जेरीमेरी परिसरात आई-वडिलांसमवेत छोट्या कुटुंबात राहते. पण, दहावीत एका विषयामध्ये ती नापास झाली. पान ८ वर »

## पालकांसह मुलीचेही समुपदेशन

कुंभार यांनी प्रियांकाला शिवाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब कोपनर यांच्याकडे नेले. त्यांनीही तिच्याशी संवाद साधला. त्यानंतर आई-वडील, मामा यांना मुंबईहून बोलावून घेतले. मुलीसह त्यांचेही समुपदेशन केले आणि मुलीला त्यांच्याकडे सुपूर्द केले. तिच्या पालकांनी पोलिसांचे कौतुक करून आभार मानले.

सकाळ – दि. ४ ऑक्टोबर, २०१९

# मुंढवा वाहतूक विभागास वडिलांच्या स्मरणार्थ कार्यालय

**मुंढवा, ता. १८ :** समाजरक्षणासाठी पोलिस अहोरात्र झटत असतात, तर समाजानेसुद्धा सामाजिक बांधिलकी स्वीकारून त्यांच्यासाठी योगदान दिले पाहिजे, हा विचार समोर ठेवून मुंढवा भागातील शिवसैनिक विशाल व मंगेश वाडेकर यांनी आपले वडील दिवंगत सुधीर बाळासाहेब वाडेकर यांच्या स्मरणार्थ मुंढवा वाहतूक विभागास येथील ताडीगुत्ता परिसरात मगरपट्टा सिटीला जोडणाऱ्या पुलाजवळ वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी स्वखर्चाने कार्यालय बांधून दिले.

या कार्यालयाचे उद्घाटन श्रीमती मंगल सुधीर वाडेकर यांच्या हस्ते करण्यात येऊन वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.

यावेळी प्रभाग २२ हडपसर मुंढवाच्या अध्यक्षा व नगरसेविका पूजा कोद्रे, सहायक पोलिस निरीक्षक सागर गरूड, उपनिरीक्षक बी. के. हंबीर, सागर कोद्रे, किशोर धायरकर, समीर तुपे, दिलीप व्यवहारे, अशोक येवले, संदीप ढवळे, शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.



मुंढवा : सुधीर वाडेकर यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

सकाळ – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

# 'मराठा टायगर फोर्स'कडून पोलिसांचा सत्कार

हडपसर, ता. ३० : वर्षभर जनतेच्या सुरक्षिततेसाठी सण, उत्सवात सुट्टी न घेता पोलिस कर्तव्य बजावत असतात. दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणालादेखील ते ड्यूटीवर हजर असतात. यामुळे माणुसकीच्या नात्याने सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी मराठा टायगर फोर्स या सामाजिक संघटनेने हडपसर पोलिस ठाण्यातील व वाहतूक विभागातील पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.

'ड्यूटी पलीकडचा माणूस' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप लहाने, प्रदेश उपाध्यक्ष नीलेश काळे, जयप्रकाश जाधव, दिलीप तुपे, रघुवीर तुपे, संतोष मुळे, अशोक खांडे, अशोक नलावडे, शुभम भोसले, आदित्य गायकवाड, अक्षय भोसले उपस्थित होते.



हडपसर : 'मराठा टायगर फोर्स'च्या वतीने पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना संघटनेचे पदाधिकारी.

सकाळ – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

# सहकारनगर पोलिस ठाण्यात भाऊबीज उत्साहात

पुणे, ता. ३० : नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलिस बांधवांचे औक्षण करून अपूर्वा सामाजिक प्रतिष्ठान तर्फे सहकारनगर पोलिस ठाण्यात भाऊबीज उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी सहकारनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकुमार बिडवई, सहायक पोलिस निरीक्षक सुहास पाटील, सुषमा माळी, पोलिस नितीन कुटवड, सतीश चव्हाण, साहिल यादव त्याचबरोबर पोलिस राणी राऊत, मंगल बारवकर, पौर्णिमा साखा, मीनाक्षी महाडीक यांचे ही औक्षण करण्यात आले.

# Missing Persons Cell traces 566 people

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The Crime Branch of Pune City Police have set up a Missing Persons Cell (as part of the Social Security Branch under Crime Branch) to trace such people. The cell started functioning on September 4 this year and till now they have found 566 persons.

While addressing a press conference at the Police Commissioner's Office, DCP (Crime Branch) Bachchan Singh said, "The local police stations could not focus much on missing person cases due to law and order duties. Therefore, the missing persons cell has been started. The staffs from the cell will call the parents/ relatives of the missing person and counsel them with empathic feeling. If the cell is not able to trace the missing person after consistent efforts, then the five field units of the Crime Branch will be roped in to aid the cell."

The cell is led by Police Inspector Vaishali Chandgude and includes PSI Priya Tilekar, constables Neelam Shinde, Rohini Jagtap, Baba Karpe, Santosh Bhandwalkar, and Sandip Kolge.



**TEAM EFFORT:** The team of missing persons cell includes a police inspector, a PSI and constables.

## PUNE'S MISSING PERSONS

- Missing Persons cell set up : September 4, 2019
- Total pending missing from 2016 till date: 3,423
- Cases probed by cell: 1,217 (Female 645, Male 572)
- Persons found: 566 (Female 323, Male 243)

## Appreciation Letter...

To,
Dr. K. Venkatesham
Commissioner of Police, Pune City

Respected Sir

We would like to take an opportunity to express our heartfelt gratitude for the immense help we received from the Bibwewadi Police Personal. World came crashing down on us when we lost our father and our mother was seriously wounded. It was Police Nayak Mr. Bhosle (6481) who noticed that she was still alive and alerted the family who immediately took her to hospital. Our mother is alive today because of the timely help imparted by the Bibwewadi police.

In the time of grief we were helped by ASI Mr. Mahajan and PC Mr. Yadav with the legal formalities in Sasoon Hospital.

We would always be indebted for the assistance provided by the whole team of Bibwewadi Police. A special word of gratitude especially for PSI Mr. Atul Thorat (for his emotional and overall assistance), PN Mr. Devkute (7546) & PC Mr. Lokhande (has been very helpful while recording our statements and apologized to us in case of delays). The whole team was lead by PI Mr. Kumar Ghadge.

Like every law abiding citizen we used to be scared of police and police stations but our experience with the Bibwewadi Police has completely changed our perception.

We (the sister duo) apart from indebted will always be available and more than happy to be of any help to the Pune Police.

Unfeigned Regards,
Daughters of a doting father

P.S. We would be very happy if this mail would be shared over the social media and other forums but request you not to reveal our identity.


150 women rescued fr
sex rackets since Janu
पोलिसांनी साजरी केली गरिबाच्या घरी दिवाळी
3 held for possession of pangolin; third case in 10 months
दीड कोटींचे ब्राउन शुगर जप्त
कोकेन विक्री करणारा नायजेरियन अटकेत
बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत
बोनस देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्याला अटक
अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या दाम्पत्याला अटक
Cops bring back minor who ran off from home
पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे मतदान शांततेत
पळालेला मुलगा पालकांकडे सुपूर्द
गुन्हे शाखेच्या विशेष पथकाकडून २२ फरारी आरोपींना अटक
हरवलेल्यांच्या शोधासाठी पोलिसांचा मिसिंग सेल
दाम्पत्याने एकत्र जीवन संपवायचे ठरविले... ...पण नियतीला त्यांचा निर्णय नव्हता मान्य
स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात
लग्नाच्या आमिषाने फसवणारा झाला गजाआड
फसविणारे दोन नायजेरियन जाळ्यात
रिक्षात विसरलेले दागिने मिळाले परत
पोलिसांनी सीसीटीव्हीवरून काढला माग
Crime Branch Unit III nabs duo with drugs worth ₹77L
संघटनांतर्फे महिला पोलिसांचा सन्मान
खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरारी पोलिसांच्या जाळ्यात
पोलिस आयुक्तांची गुन्हेगारी 'सफाई' मोहीम सुरू
'दामिनी'ने अल्पवयीन मुलीला दिले आई-वडिलांच्या ताब्यात
Cops bring back minor who ran off from home
विधिसंघर्षित मुलां
भांडण करून पळालेला मुलगा सुखरूप परत
मोबाईल वेडापायी मुलीने सोडले घर
खून करणाऱ्या म्होरक्यासह पाच जणांना अटक
फसवणूक करणाऱ्याला दिल्लीतून अटक